॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे



**देवी कालरात्री**

नवरात्रोत्सवाच्या सातव्या दिवशी पूजली जाणारी माता दुर्गाची सातवी शक्ती आहे.

अहिल्यानगर ■ शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १०२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### नाराज

कुणावर होतोय अन्याय
कुणाचा दबतो आवाज
चांगले असणारा सुद्धा
सोयीने होतात नाराज

इकडे राहून तिकडचे काम
सेवेचा भाव पाहू नंतर
राजकारणाच्या गावगाड्यात
गोंडस बाळ असते पक्षांतर

# टंचाईच्या काळात प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत योजनांचा लाभ पोहोचवा!

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रशासनाला निर्देश । पाणी-चारा व्यवस्थापनासाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे आवाहन

● **श्रीरामपूर । वीरभूमी-**
टंचाईच्या परिस्थितीत पाणीपुरवठा आणि चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याबरोबरच शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ शेतकरी, नागरिक आणि समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

श्रीरामपूर येथे आयोजित तालुकास्तरीय टंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार हेमंत ओगले, माजी आमदार लहू कानडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, प्रभारी जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, महावितरणचे कार्यकारी अभियंता रमेश पवार व बाळासाहेब शेटे, श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी किरण सावंत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधीर बोराळे, पशुसंवर्धन उपायुक्त उमेश पाटील, तहसीलदार मिलिंद वाघ, नगरपालिका मुख्याधिकारी मनोज उकिरडे, गटविकास अधिकारी स्मिता निकाळजे यांच्यासह तालुकास्तरीय यंत्रणांचे प्रमुख, शेतकरी, विविध गावांतील ग्रामस्थ आणि सरपंच उपस्थित होते.

'शासन आपल्या दारी' या संकल्पनेनुसार दुष्काळी परिस्थितीत चारा उपलब्ध करून देणे, कर्जमाफीसंदर्भातील प्रश्न, पाण्याचे नियोजन आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा. कोणताही पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये. प्रत्येक योजनेचा लाभ पात्र व्यक्तीपर्यंत नियमानुसार पोहोचवावा, असे आवाहन विखे पाटील यांनी केले.



जिल्ह्यातील उपलब्ध चारा, पशुधनाची संख्या, चाऱ्याची गरज, त्याची निर्मिती व साठवणूक तसेच भविष्यातील नियोजन या बाबतीत अहिल्यानगर जिल्ह्याने मार्गदर्शक काम केले आहे. तालुकास्तरावर नियमित आढावा बैठका घेतल्यामुळे चारा व्यवस्थापनाचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता आले, असे विखे पाटील यांनी नमूद केले. प्रशासनाच्या तालुकानिहाय आढावा बैठकांमध्ये विविध सूचना आणि उपाययोजनांचा समावेश करण्यात आल्याने जिल्हा चारा व्यवस्थापनाच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरत असल्याचेही त्यांनी सांगितले.

जलजीवन मिशन आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांच्या कामांमध्ये आढळणारा निकृष्टपणा, हलगर्जीपणा आणि दिरंगाई यांची जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करावी. या पाहणीचा तालुकानिहाय अहवाल शासनाला सादर करावा, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

पाणीपुरवठा खंडित होऊ नये, यासाठी महावितरणने वेळोवेळी उद्भवणाऱ्या अडचणी दूर कराव्यात. डीपी आणि ट्रान्सफॉर्मरशी संबंधित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करावी. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरण आणि पाणीपुरवठा विभागाने परस्पर समन्वय राखणे आवश्यक असल्याचे पालकमंत्री विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

प्रवरा कालव्यात होणारे प्रदूषण रोखण्यासाठी कालवा बंदिस्त करण्याच्या कामाला मंजुरी मिळाली असून, त्यासाठी ४५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

या कामामुळे प्रदूषणावर नियंत्रण मिळवून कालव्यातील पाणी स्वच्छ स्वरूपात वापरासाठी उपलब्ध होण्यास मदत होईल. तसेच कालव्याच्या हद्दीत राहणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन आणि इतर संबंधित बाबींसाठीही या निधीचा वापर केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जनतेच्या हक्कांचे आणि हिताचे रक्षण करण्यासाठी प्रशासनाने लोकाभिमुख भूमिका घेऊन शासकीय योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवावा. विविध विभागांनी समन्वयकाची भूमिका निभावून नागरिकांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन पालकमंत्र्यांनी केले.

ग्रामसेवक, महसूल अधिकारी आणि पशुविकास अधिकाऱ्यांनी विविध गावांना भेट देण्याचे वेळापत्रक संबंधित ग्रामपंचायतीमध्ये प्रसिद्ध करावे. त्यामुळे नागरिकांना आपल्या समस्या मांडणे आणि त्यांचे निराकरण करून घेणे सुलभ होईल, असेही त्यांनी सांगितले.

### आठ गावांतील पाणीप्रश्नांचा आढावा

■ श्रीरामपूर तालुक्यातील वांगी, खेर्डी, टाकळीभान, उंदीरगाव, निमगाव, बेलापूर बुद्रुक, भोकर आणि खैरी या गावांमधील पाणीप्रश्न तसेच जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा पालकमंत्र्यांनी आढावा घेतला. ग्रामस्थांनी मांडलेल्या सूचना आणि समस्यांवर कार्यवाही करण्याचे निर्देश महावितरण, जलजीवन मिशन, पाणीपुरवठा विभाग आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

## SPOT NEWS

### मसाले विक्रेत्यांना आता अन्न परवाना अनिवार्य

● **मुंबई** – महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाच्या माध्यमातून सेफ फूड, सेफ ड्रग्स अभियान आक्रमकपणे राबवणारे डॅशिंग अधिकारी आणि एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांची नजर आता मसाले आणि मसाल्याच्या पदार्थांतील भेसळीकडे वळली आहे. दूध आणि डेअरी उत्पादकांनंतर आता तुकाराम मुंढे यांनी मसाला उत्पादक, विक्रेते आणि हॉटेल व्यावसायिकांसाठी कडक आदेश जारी केले आहेत. या आदेशांनुसार मसाल्यांमध्ये भेसळ करणे, कृत्रिम रंगांचा वापर करणे किंवा पॅकेटवर खोटे आणि दिशाभूल करणारे दावे करणे यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मकोकासारखी कठोर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. एफडीएने जारी केलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार हळद, तिखट, मिरची, दालचिनी, काळीमिरी, खसखस यासह सर्वच प्रमुख मसाले आणि मसाल्यांच्या पदार्थांवर खालील कडक नियम लागू करण्यात आले आहेत. बाजारात सुट्या मसाल्यांची विक्री करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. केवळ वैध अन्न परवाना असलेल्यांनाच मसाले विक्री करता येईल. मसाल्यांमध्ये आकर्षक दिसण्यासाठी वापरले जाणारे कृत्रिम रंग, औद्योगिक रंग किंवा अर्क काढलेल्या निकृष्ट दर्जाच्या मसाल्यांची भेसळ करण्यास सक्त मनाई आहे. मसाल्यांच्या निर्जंतुकीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या इथिलिन ऑक्साईड या धोकादायक रसायनाच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली आहे.

### सणोत्सवात पदपथांवर फटाके फोडण्यास बंदी

● **पिंपरी** – आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर आणि सण-उत्सवांच्या काळात होणारे वायू आणि ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय दिला. दिवाळीसह वर्षभरातील सर्वच सणांदरम्यान सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके फोडण्यावर पूर्णपणे बंदी घालण्याचे कडक आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि प्रशासनाला दिले. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने सुमोटो याचिका आणि इतर याचिकांवर सुनावणी करताना हे महत्त्वपूर्ण निर्देश दिले. विषारी प्रदूषणामुळे लहान मुले आणि ज्येष्ठांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. त्यामुळे आता काळ बदलला असून हे चित्र बदलणे गरजेचे आहे, अशी कडक टिप्पणी न्यायालयाने केली.

# पाथर्डीतील सर्व शाळांची होणार गुणवत्ता तपासणी

## 'एक दिवस, एक केंद्र, शाळा भेट' उपक्रमाला सुरुवात; पिंपळगाव टप्पा केंद्रातील २० शाळांची सखोल पाहणी

● **पाथर्डी । वीरभूमी-**
जिल्हा परिषद शाळांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासोबतच भौतिक सुविधा आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत 'एक दिवस, एक केंद्र, शाळा भेट' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत बुधवारी (दि. १४) पिंपळगाव टप्पा केंद्रातील सर्व २० शाळांची क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी एकाच दिवशी सखोल तपासणी केली.



जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तालुक्यातील सर्व शाळांची टप्प्याटप्प्याने तपासणी करण्यात येणार असून, वर्षातून दोन वेळा शाळांना सखोल भेटी देण्यात येतील, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी सचिन राख यांनी दिली.

तपासणीदरम्यान शाळांमधील वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, शुद्ध पिण्याचे पाणी, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प, स्वयंपाकगृह, पोषण आहार व्यवस्था, वीज, संरक्षक भिंत, क्रीडांगण आणि क्रीडा साहित्य या भौतिक सुविधांची पाहणी करण्यात आली.

तसेच विद्यार्थी व शिक्षकांची उपस्थिती, वर्गअध्यापन, भाषा व गणित विषयातील विद्यार्थ्यांची संपादणूक, निपुण महाराष्ट्र अभियान, गणित-विज्ञान उपक्रम, मूल्यवर्धन, आनंददायी शनिवार, पीएम पोषण योजना, विद्यार्थी सुरक्षा तसेच शैक्षणिक साहित्य आणि प्रयोगशाळेचा वापर यांचाही आढावा घेण्यात आला.

अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून त्यांच्या अध्ययन निष्पत्तीची पडताळणी केली. शाळांमधील त्रुटी तसेच चांगल्या बाबींची नोंद करून शिक्षकांना आवश्यक सुधारणांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शाळांच्या गरजा आणि अडचणी जाणून घेतल्यानंतर भेटीच्या शेवटी मुख्याध्यापक, शिक्षक, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत शाळांच्या विविध समस्या, गरजा आणि शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली.

तपासणीवेळी गटशिक्षणाधिकारी सचिन राख, पीएम पोषण योजनेचे अधीक्षक रामनाथ कराड, शिक्षण विस्तार अधिकारी निलेश शिरसागर यांच्यासह केंद्रप्रमुख, विषयतज्ज्ञ आणि विशेष शिक्षक सहभागी झाले होते.

तपासणीत आढळलेल्या त्रुटी पुढील भेटीपर्यंत दूर करण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यासोबतच पायाभूत सुविधांमध्येही सुधारणा होण्यास मदत होईल, असा विश्वास गटशिक्षणाधिकारी सचिन राख यांनी व्यक्त केला.

# पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप

● **राहता । वीरभूमी-**
महिला शेतकरी प्रमाणपत्रांमुळे महिलांच्या कष्टांना अधिकृत ओळख आणि सन्मान मिळणार आहे. राहता तालुक्यात आतापर्यंत २० हजार महिला शेतकऱ्यांनी प्रमाणपत्रासाठी नोंदणी केली आहे. महिलांचा हा उत्स्फूर्त प्रतिसाद ग्रामीण भागातील महिलांचा कृषी क्षेत्रातील सक्रिय सहभाग अधोरेखित करणारा आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



महिला सक्षमीकरण विधेयकाच्या अनुषंगाने अहिल्यानगर जिल्ह्यात महिला शेतकरी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. राहता येथील कुंदन लॉन्स येथे आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते महिलांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

महिला शेतकरी प्रमाणपत्रांमुळे ग्रामीण भागातील महिलांना शेती क्षेत्रात स्वतंत्र ओळख आणि सन्मान मिळणार असून, त्यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाला अधिकृत मान्यता मिळण्यास मदत होणार आहे. हा उपक्रम महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कार्यक्रमात बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले, शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांचे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान असते. त्यांच्या कष्टांना, श्रमांना आणि कृषी क्षेत्रातील सहभागाला अधिकृत मान्यता मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने हे पाऊल उचलले आहे. महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख मिळवून देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि कृषी क्षेत्रातील विविध योजनांचा लाभ थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना सक्षम करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या प्रमाणपत्रांमुळे महिलांना कृषी क्षेत्रातील आपले योगदान अधिकृतपणे नोंदविण्याची संधी मिळणार आहे. तसेच त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठीही या उपक्रमाची मदत होणार आहे.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, प्रभारी जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी विवेक गुंड, राहता तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि महिला शेतकरी उपस्थित होत्या.

# एआय संशोधनात चांडगावच्या श्रद्धा लोंढेची राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णझेप!

## दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांसाठी AI आधारित शिक्षक सहाय्यक प्रकल्पाला प्रथम क्रमांक । INSPIRE-MANAK स्पर्धेत महाराष्ट्राचा गौरव

● **श्रीगोंदा । वीरभूमी-**
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची क्षमता आणि सामाजिक प्रश्नांकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्याची दृष्टी किती प्रभावी असू शकते, याचा प्रत्यय चांडगावच्या श्रद्धा रमेश लोंढे हिने दिला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागातील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, चांडगाव येथील या विद्यार्थिनीने भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या INSPIRE-MANAK उपक्रमांतर्गत आयोजित १२ व्या राष्ट्रीय प्रदर्शन व प्रकल्प स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे झालेल्या या राष्ट्रीय स्पर्धेतील तिच्या यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव झाला आहे.

श्रद्धाने "AI-Based Teacher Assistant for Visually Impaired' अर्थात दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शिक्षक सहाय्यक हा प्रकल्प सादर केला. दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण अधिक सुलभ आणि उपयुक्त व्हावे, या सामाजिक जाणिवेतून तिने ही संकल्पना विकसित केली. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शिक्षणातील अडचणींवर उपाय शोधण्याचा तिचा प्रयत्न या प्रकल्पाचे वैशिष्ट्य ठरले. केवळ तांत्रिक कल्पकतेपुरते मर्यादित न राहता समाजातील एका महत्त्वाच्या गरजेला संशोधनाशी जोडण्याची दृष्टी श्रद्धाने दाखवून दिली.

१२ ते १४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत नवी दिल्लीतील भारत मंडपम, हॉल क्रमांक ५, लेव्हल १ येथे १२ वी राष्ट्रीय INSPIRE-MANAK प्रदर्शन व प्रकल्प स्पर्धा झाली. देशातील विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील विद्यार्थ्यांनी आपले नावीन्यपूर्ण वैज्ञानिक प्रकल्प आणि प्रोटोटाइप सादर केले. सुमारे ७५० ते ८०० प्रकल्पांमधून निवडक संशोधनाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. १४ ऑक्टोबर रोजी केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते निवडक युवा संशोधकांचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेत महाराष्ट्रातील सात विद्यार्थ्यांनी 'सुपर ६०' गटात स्थान मिळवले. याच स्पर्धेत श्रद्धाने प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले.

श्रद्धाच्या यशामागे तिची जिज्ञासू वृत्ती, सातत्यपूर्ण मेहनत, नावीन्यपूर्ण विचार आणि मार्गदर्शक शिक्षक सुभाष गायकवाड यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यालयाचे मुख्याध्यापक, पालक, चांडगाव शाखेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही तिला सहकार्य लाभले. ग्रामीण भागातील शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांना संशोधनाकडे वळण्यासाठी प्रेरणा देणारे आहे.




श्रद्धाच्या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, उपाध्यक्ष अरुण कडू-पाटील, व्हाइस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, सचिव किशोर राजेनिंबाळकर, सहसचिव (उच्च) डॉ. शिवलिंग मेनकुदळे, सहसचिव (माध्यमिक) बी. एन. पवार, सहसचिव (ऑडिट) डॉ. राजेंद्र मोरे, उत्तर विभागीय समन्वय समितीचे चेअरमन आमदार रोहितदादा पवार, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य आमदार आशुतोष काळे, मीनाताई जगधने, बाबासाहेब भोस, ॲड. संदीप वर्पे, सुरेशजी बोळीज, राजेंद्र मस्के, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहाय्यक अधिकारी बाबासाहेब नाईकवडी व प्रमोद तोरणे, गुणवत्ता कक्षाचे मार्गदर्शक काकासाहेब वाळुंजकर, माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, गुणवत्ता कक्षाचे प्रमुख सुधीर साबळे, इन्स्पायर अवॉर्डचे प्रमुख प्रणव नलगे आणि गुणवत्ता विकास कक्षातील सदस्यांनी अभिनंदन केले.

### ग्रामीण प्रतिभेला संशोधनाची नवी दिशा

■ विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, नावीन्यपूर्ण कल्पना आणि समाजोपयोगी संशोधनाची आवड निर्माण करणे हा INSPIRE-MANAK उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. श्रद्धाच्या यशाने ग्रामीण विद्यार्थ्यांना विज्ञान, संशोधन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी नवी प्रेरणा दिली आहे. योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि संधी मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतात, हे तिच्या कामगिरीने अधोरेखित केले आहे. चांडगावच्या मातीतून राष्ट्रीय स्तरावर झेप घेणाऱ्या श्रद्धा लोंढे हिचे सुवर्णयश हे रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक परंपरेचा आणि ग्रामीण विद्यार्थ्यांच्या संशोधनक्षमतेचा गौरव ठरले आहे.

## SPOT NEWS



### श्री मार्कंडेय पतसंस्थेत गुणवंतांचा गौरव; विद्यार्थ्यांना यशाचे मार्गदर्शन

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

श्री मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित आणि श्री मार्कंडेय अभ्यासिका व ग्रंथालयाच्या वतीने समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी नियुक्ती झाल्याबद्दल मुख्याध्यापक बाबासाहेब बोडखे यांचा, तर जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल व्यावसायिक सुरेशराव चव्हाण यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बापूसाहेब उत्तेकर आणि नगरसेवक निखिल वारे उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना बाबासाहेब बोडखे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी, ध्येय निश्चिती, वेळेचे नियोजन आणि सातत्यपूर्ण अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले. चांगला माणूस बना; जिद्द आणि चिकाटीने यश मिळवा, असा संदेश त्यांनी दिला. अपयशातून शिकून आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे आवाहनही त्यांनी केले. पतसंस्थेच्या अभ्यासिका व ग्रंथालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणारे शैक्षणिक व्यासपीठ कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले. सुरेशराव चव्हाण यांनी तरुणांना उद्योजकतेचे महत्त्व सांगितले. व्यवसायात यश मिळविण्यासाठी मेहनत, प्रामाणिकपणा, सातत्य, ग्राहकांशी विश्वासाचे नाते आणि बदलत्या काळानुसार कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तरुणांनी नोकरीसोबत स्वतःचा व्यवसाय उभारण्याचाही विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. नगरसेवक निखिल वारे यांनी पद्मशाली समाजाच्या कष्टकरी परंपरेचा गौरव केला. गोरगरीब नागरिक आणि विडी कामगारांना आर्थिक आधार देण्याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या पतसंस्थेच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. बापूसाहेब उत्तेकर यांनीही संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना आपल्या जीवनप्रवासातील संघर्षाचे अनुभव सांगितले. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन नारायण विश्वनाथ कोडम, व्हाईस चेअरमन सविता प्रकाश कोटा, बालराज सामल, तसेच संचालक मंडळातील सदस्य, व्यवस्थापक आशिष बोगा, कर्मचारी, विद्यार्थी, सभासद आणि नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन बालराज सामल यांनी केले, तर सविता कोटा यांनी आभार मानले.

### अहिल्यानगरमध्ये जागतिक पांढरी काठी दिन उत्साहात

**अहिल्यानगर । वीरभूमी -**

दृष्टिबाधित व्यक्तींना स्वावलंबनासाठी प्रोत्साहन देणे, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे आणि समान संधींचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अहिल्यानगरमध्ये जागतिक पांढरी काठी दिन २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. दिव्य दृष्टी दिव्यांग विकास व संशोधन संस्था आणि शोभा सर्वोदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी धनश्रीताई विखे पाटील, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, ब्रिगेडियर राजीव चावला, वरिष्ठ डाक अधीक्षक विकास पालवे, उपअधीक्षक शिरीष वमने, बँक ऑफ बडोदाचे मनीष कुमार, हरजीतसिंग वधवा, दिव्य दृष्टी संस्थेचे कृष्णा तवले आणि पीआरएम सॉफ्ट सोल्युशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमन कुरेल उपस्थित होते. यावेळी शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनतर्फे ५० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. शोभा सर्वोदय फाउंडेशनतर्फे २५० जणांना डिजिटल पांढऱ्या काठ्या, बँक ऑफ बडोदातर्फे १०० जणांना सॅक, तर डॉ. सुजय विखे फाउंडेशन आणि जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या (डीआरडीसी) माध्यमातून स्मार्ट किटचे वितरण करण्यात आले. दिव्यांगांसाठी ई-सायकलींचेही वाटप करण्यात आले. धनश्रीताई विखे पाटील यांनी दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रोत्साहन व समान संधी देण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमात दृष्टिबाधित व्यक्तींना स्पर्धा परीक्षांच्या संधी, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिक समावेशन, बँकिंग सुविधा, गुन्हे प्रतिबंधक जागरूकता आणि शासकीय योजनांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तिरुपती गायकवाड यांनी दिव्यांगांसाठी उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या उपयोगाची माहिती दिली, तर बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रादेशिक व्यवस्थापक रवी रंजन प्रशून यांनी आर्थिक समावेशन व बँकिंग सुविधांबाबत मार्गदर्शन केले. दिव्यांगांच्या शिक्षण, पुनर्वसन आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल जुन्नर येथील सेंटर फॉर डिसॅबिलिटी आर्ट्स डेव्हलपमेंटचे संस्थापक विकास बाजीराव घोगरे, अनामप्रेमच्या अनिता माने, दृष्टिबाधित विद्यार्थ्यांसाठी कार्य करणारे शिक्षक सुनील परभणे आणि आकांक्षा रिहॅबिलिटेशन सेंटरच्या संचालिका सविता काळे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# श्रीगोंद्यात फुटवेअर दुकानातून गांजा पकडला

**गुन्हे शाखेचा छापा । २ किलो १६७ ग्रॅम गांजासह १ लाख ८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त; एकाला ताब्यात**

**श्रीगोंदा । वीरभूमी -**

श्रीगोंदा शहरातील गोदड महाराज मठाजवळील साईसेवा फुटवेअर दुकानातून गांजाची विक्री होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने गुरुवारी (दि. १५) छापा टाकून सागर अविनाश बोराडे (वय ३४, रा. लोहार गल्ली, श्रीगोंदा) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून २ किलो १६७ ग्रॅम गांजासह एकूण १ लाख ८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील गांजा पुरवठा करणारा अक्षय (पूर्ण नाव माहीत नाही, रा. चौंडी, ता. जामखेड) हा फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.




पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी अवैध धंद्यांविरोधात कारवाईसाठी पथक नियुक्त केले होते. या पथकात सहायक पोलीस निरीक्षक हरीष भोये तसेच पोलीस अंमलदार बिरप्पा करमल, प्रताप देवकाते, अमोल कोतकर, मनोज साखरे, बाळासाहेब गुंजाळ, सतीश भवर आणि भगवान धुळे यांचा समावेश होता.

१५ ऑक्टोबर रोजी पथक श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांची माहिती घेत असताना साईसेवा फुटवेअर दुकानातून गांजाची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांना लेखी अहवालाद्वारे माहिती देण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी, कर्जत उपविभाग यांच्या आदेशानुसार सहायक पोलीस निरीक्षक कौशलरामनिरंजन वाघ, स्थानिक गुन्हे शाखेचे तपास पथक आणि श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस अंमलदार शोभा कुरुळे यांनी पंचांच्या उपस्थितीत दुकानाची झडती घेतली. यावेळी एका कापडी पिशवीत गांजा आढळून आला.

पोलिसांनी २ किलो १६७ ग्रॅम गांजा व ५० रुपये किमतीची कापडी पिशवी असा एकूण १ लाख ८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीदरम्यान हा गांजा अक्षय याच्याकडून घेतल्याचे बोराडे याने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९२३/२०२६ अन्वये अमली पदार्थ व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ च्या कलम ८(क) व २०(ब)(ii) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर आणि श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदारांनी केली. फरार आरोपीचा शोध सुरू असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## बँकेच्या ७.३१ लाखांच्या अपहारप्रकरणी चार वर्षांपासून फरार आरोपी जेरबंद

**बेलवंडी पोलिसांची कारवाई । कर्जदारांकडून हप्ते वसूल करून रक्कम बँकेत भरलीच नाही**

**श्रीगोंदा । वीरभूमी -**

कोटक महिंद्रा बँकेच्या कर्जदारांकडून हप्त्यांची रक्कम वसूल करून ती बँकेत जमा न करता अपहार केल्याच्या प्रकरणात चार वर्षांपासून फरार असलेल्या सागर तुळशीराम शिंदे (रा. ढवळगाव, ता. श्रीगोंदा) याला बेलवंडी पोलिसांनी अटक केली. गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून पोलिसांनी ही कारवाई केली. या प्रकरणात एकूण ७ लाख ३१ हजार ९२० रुपयांच्या अपहाराचा आरोप आहे.




कोटक महिंद्रा बँकेच्या नागापूर शाखेचे व्यवस्थापक संजय रघुनाथ भंडारे यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सागर शिंदे आणि गोविंद बबन गाडे (रा. कांबी, ता. शेवगाव) हे दोघे बँकेत कलेक्शन एक्झिक्युटिव्ह म्हणून कार्यरत होते. मे ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत त्यांनी विविध कर्जदारांकडून कर्जाच्या हप्त्यांची रक्कम रोख स्वरूपात वसूल केली; मात्र ती बँकेत जमा न करता परस्पर वापरल्याचा आरोप आहे.

या दोघांनी मिळून ७ लाख ३१ हजार ९२० रुपयांचा अपहार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यापैकी सागर शिंदे याच्याशी संबंधित अपहाराची रक्कम ३ लाख ३८ हजार ७३० रुपये असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी भारतीय दंड विधानाच्या कलम ४०९, ४२० आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर सागर शिंदे फरार होता. त्याचा शोध सुरू असताना बेलवंडी पोलिसांना त्याच्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली. पुढील तपास आणि कायदेशीर कारवाईसाठी त्याला एमआयडीसी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, डी.वाय. एस.पी. सुजितकुमार क्षीरसागर आणि पोनि. नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. दादासाहेब क्षीरसागर, भाऊसाहेब यमगर, गाडीलकर आणि पोकॉ. विनोद पवार यांच्या पथकाने केली.

## दुष्काळामुळे महिला बचत गट संकटात, खाजगी मायक्रो फायनान्स कंपन्यांनी वसुली थांबवावी : माजी आ. स्नेहलताताई कोल्हे

**कोपरगाव । वीरभूमी-**



मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीमुळे महिलांच्या हाताला काम नसल्याने त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. रोजगाराअभावी कर्जाचे हप्ते भरणे कठीण झाले असतानाही खासगी मायक्रो फायनान्स कंपन्यांचे कर्मचारी माहिला बचत गटाच्या महिलांच्या घरी जाऊन तसेच त्यांच्या कुटुंबीयांकडे कर्जाचे हप्ते भरण्यासाठी तगादा लावत असल्याच्या तक्रारी महिलांनी समक्ष भेटून मांडलेल्या असून त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत महिलांकडून होणारी कर्जवसुली तातडीने थांबवावी यासाठी कठोर नियमावली करावी अशी मागणी मा.आ.स्नेहलताताई कोल्हे यांनी शासनाकडे केली आहे. महिला बचत गट दुष्काळात संकटात असल्याने सदरची वसुली होऊ न देता सहकार्य करावे अशी विनंती शासनाकडे केली आहे.

कोपरगाव तालुक्यासह विधानसभा मतदारसंघातील बचत गटाच्या महिलांनी माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांची भेट घेऊन खासगी मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून होत असलेल्या पठाणी वसुलीबाबत तक्रारी मांडल्या. कर्जाचे हप्ते थकल्यानंतर कंपन्यांचे कर्मचारी महिलांच्या घरी जाऊन वसुलीसाठी दबाव आणत असल्याने महिलांसह त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे या महिलांनी सांगितले. या तक्रारींची दखल घेत स्नेहलताताई कोल्हे यांनी सदर प्रकरण वरिष्ठ स्तरावर कळविले आहे.

ग्रामीण भागातील अनेक महिला कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी खासगी मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून उच्च व्याजदराने कर्ज घेतात.कर्ज घेताना महिलांकडून आधारकार्ड, पॅनकार्ड यांसह आवश्यक कागदपत्रे घेतली जातात. यापैकी बऱ्याच मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून १८ ते २४ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक व्याज आकारले जात असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.

दुष्काळापूर्वी महिला नियमितपणे कर्जाचे हप्ते भरत होत्या. मात्र, सध्याच्या परिस्थितीत रोजगार उपलब्ध नसल्याने उत्पन्नाचे साधन कमी झाले आहे. घरखर्च भागविणे आणि कर्जाचे हप्ते भरणे कठीण बनले आहे. अशा परिस्थितीत खाजगी मायक्रो फायनान्स कर्मचारी वसुलीसाठी महिलांच्या घरी जाऊन तसेच कुटुंबीयांकडे तगादा लावून दबाव आणला जात असल्याने महिलांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करून खासगी मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनी कर्जवसुलीसाठी कोणत्याही महिलेच्या घरी जाऊ नये. संबंधित कंपन्यांच्या वसुली पद्धतींची चौकशी करून नियमबाह्य वसुली करणाऱ्यांवर कारवाई करावी आणि अडचणीत सापडलेल्या महिलांना दिलासा द्यावा, अशी मागणी मा.आ.स्नेहलताताई कोल्हे यांनी शासनाकडे वरिष्ठस्तरावर केली आहे.

## टंचाईच्या झळा वाढल्या : शेवगावातील दहा वाड्या-वस्त्यांना टँकरने पाणी द्या!

**शिवाजी आधाट यांच्या नेतृत्वाखाली शेवगाव मुख्याधिकाऱ्यांना निवेदन**

**शेवगाव । वीरभूमी-**

कमी पाऊस आणि खालावलेली भूजलपातळी यामुळे शेवगाव शहरातील विविध वाड्या-वस्त्यांमध्ये पाणीटंचाईचे संकट गडद झाले आहे. माळीवाडा, मगर वस्ती, नागरे वस्ती, गणेशनगर यांसह दहा भागांतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यातच पशुधनाच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला असून, प्रशासनाने टंचाईग्रस्त भागात तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी भाजप युवा मोर्चाचे शेवगाव शहर सरचिटणीस शिवाजी आधाट यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने केली आहे.

याबाबत नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांना निवेदन देण्यात आले. यंदा कमी पाऊस झाल्याने शहरालगतच्या वाड्या-वस्त्यांमधील विहिरींची पाणीपातळी खालावली आहे. त्यामुळे नागरिकांना पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी मोठी धडपड करावी लागत आहे.

माळीवाडा, मगर वस्ती, नागरे वस्ती, गणेशनगर, आढाव वस्ती, बडवे वस्ती, शिंदे वस्ती, शिंगे वस्ती, शेंडे वस्ती तसेच खुंटेफळ रोडवरील डाके मळा या भागांमध्ये पाणीटंचाईची तीव्रता वाढली आहे.

या परिसरातील अनेक कुटुंबांकडे पशुधन असून, पिण्याच्या पाण्याअभावी जनावरांचेही हाल होत आहेत. त्यामुळे नागरिकांसमोर पिण्याच्या पाण्यासोबतच पशुधनासाठी पाण्याची व्यवस्था करण्याचेही मोठे संकट उभे राहिले आहे.

प्रशासनाने टंचाईग्रस्त भागांची तातडीने पाहणी करून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घ्यावे आणि प्रत्यक्ष टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. केवळ आश्वासनांवर वेळ न घालवता नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. तसेच पशुधनासाठीही पाण्याची उपलब्धता करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनाची प्रत आमदार मोनिका राजळे यांनाही पाठविण्यात आली आहे.



निवेदनावर भाजप युवा मोर्चाचे शहर सरचिटणीस शिवाजी आधाट, खंडू बुलबुले, नगरसेवक आशुतोष डहाळे, शाम डाके, दीपक नांगरे, रोहित नांगरे, सागर आधाट, शुभम नांगरे, रोहित भुजबळ, संदेश मगर, सचिन नांगरे, रवींद्र लिंगे, साईनाथ भुजबळ, देविदास लिंगे, अमोल नाईक, कार्तिक नांगरे, अनिकेत डाके, दत्तात्रय नांगरे, बाळासाहेब शित्रे, गणेश शिंदे, राहुल शित्रे, हरी नांगरे, विशाल आधाट, कृष्णा नांगरे यांच्यासह अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# २० वर्षांनंतर कोपरगावच्या मुलींचा व्हॉलीबॉल संघ राज्यस्तरावर!

**गौतम पब्लिक स्कूलच्या मुलींच्या संघाचे ऐतिहासिक यश**

**कोपरगाव । वीरभूमी-**

गौतम पब्लिक स्कूलचा १४ वर्षांखालील मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये विजय मिळवून या संघाची थेट राज्यस्तरीय शालेय स्पर्धे साठी निवड झाली असून हा संघ आगामी रत्नागिरी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धे त पुणे विभागाचे नेतृत्व करणार आहे. याचबरोबर शालेय जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत गौतमच्या १४, १७ आणि १९ वर्षांखालील तिन्ही संघ विजयी झाले असून या संघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे अशी माहिती शाळेचे प्राचार्य नूर शेख यांनी दिली. व्हॉलीबॉल आणि हॉकीतील विजयामुळे गौतम पब्लिक स्कूलच्या क्रीडा गुणवत्तेची सर्वत्र चर्चा होत आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत १५ ऑक्टोबर रोजी सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथे १४ वर्षांखालील मुलींच्या विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा पार पडल्या. या अटीतटीच्या स्पर्धेत गौतम पब्लिक स्कूलच्या मुलींनी अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले होते. गौतमच्या संघाने पुणे ग्रामीण विरुद्ध उपांत्यपूर्व सामन्यात १५/४ अशी आघाडी घेत विजय मिळवला. उपांत्य सामन्यात सोलापूर ग्रामीण संघाविरुद्ध गौतमच्या संघाने २५/५ असा एकतर्फी विजय मिळवून थेट अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम लढतीत अहिल्यानगर आणि पुणे ग्रामीण यांच्यात झालेल्या चुरशीच्या सामन्यात, गौतमच्या संघाने २५/१६ अशी मात देत विभागीय स्पर्धेत विजय मिळवला. तब्बल २० वर्षांनंतर कोपरगाव तालुक्याच्या मुलींचा व्हॉलीबॉल संघ राज्यस्तरीय शालेय स्पर्धेत खेळणार आहे. नोव्हेंबरमध्ये रत्नागिरी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यस्तरीय स्पर्धेत गौतमचा संघ पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

याच बरोबर गौतम पब्लिक स्कूलच्या हॉकी संघांनीही जिल्हास्तरीय स्पर्धेत आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.१४, १७ आणि १९ वयोगटांतील संघांनी दणदणीत विजय मिळवला असून या संघाला विभागीय स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळाला आहे. १४ वयोगटाच्या अंतिम सामन्यात गौतम पब्लिक स्कूलने सोनईच्या यश अकॅडमीचा ३/० असा पराभव केला. १७ वयोगटातील गौतमच्या संघाने सोनईच्या यश अकॅडमीविरुद्ध ३/० असा दणदणीत विजय मिळवून आपले वर्चस्व सिद्ध केले. तसेच १९ वर्षांखालील गटात संगमनेर कॉलेज विरुद्ध झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात गौतमच्या खेळाडूंनी नियोजनबद्ध आणि आक्रमक खेळ करत ३-० फरकाने विजय मिळवला.

गौतम पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल आमदार आशुतोष काळे यांनी व्हॉलीबॉल संघाचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. याचबरोबर कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मा. आ. अशोकराव काळे, सचिव सौ.चैतालीताई काळे, संथेचे इन्स्पेक्टर नारायण बारे, संस्थेचे सर्व संचालक मंडळ, सदस्य आणि शाळेचे प्राचार्य नूर शेख यांनी हॉकी व व्हॉलीबॉल संघाचे अभिनंदन केले.



# SPOT NEWS

## पारनेरच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज मध्ये माजी प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा शनिवारी स्नेहमेळावा

**● पारनेर । वीरभूमी –**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर या महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त सेवानिवृत्त प्राध्यापक आणि माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. महाविद्यालयाच्या ५० वर्षांच्या गौरवशाली शैक्षणिक वाटचालीचा आनंद साजरा करण्यासाठी हा मेळावा होणार आहे.ज्ञानदान, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची परंपरा जपत महाविद्यालयाने गेल्या पाच दशकांत शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) A++ मानांकन प्राप्त झाले असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारही मिळाला आहे. याशिवाय शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि अन्य क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल महाविद्यालयाने विविध पुरस्कार व सन्मान प्राप्त केले आहेत.महाविद्यालयाच्या या यशस्वी वाटचालीत सेवानिवृत्त प्राध्यापकांचे ज्ञान, अनुभव, समर्पण आणि विद्यार्थ्यांवर केलेले संस्कार यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्याचबरोबर माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत मिळवलेले यश आणि महाविद्यालयाशी जपलेले नाते ही संस्थेची मोठी संपत्ती आहे. या सर्वांच्या योगदानाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या निमित्ताने माजी प्राध्यापक आणि माजी विद्यार्थ्यांना अनेक वर्षांनंतर एकत्र येण्याची, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची आणि महाविद्यालयाच्या प्रगतीचा गौरव करण्याची संधी मिळणार आहे. पन्नास वर्षांच्या प्रवासात संस्थेशी जोडलेल्या विविध पिढ्यांमधील स्नेहबंध अधिक दृढ व्हावेत, हा या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाचा हा सोहळा ए.पी.जे. अब्दुल कलाम सभागृह, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर येथे होणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्यास सेवानिवृत्त प्राध्यापक आणि माजी विद्यार्थ्यांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन सुवर्ण महोत्सव आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी सर्वांना स्नेहमेळाव्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले आहे.

## हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भाविकांना खिचडी व फळांचे वाटप

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सामाजिक, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून भिंगार येथील विजयलाइन चौकातील अंबिका तरुण मंडळाच्या तुळजामाता मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले. तसेच मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीतून नागरिकांना दिलासा मिळावा आणि सर्वत्र समाधानकारक पाऊस पडावा, यासाठी तुळजामाता चरणी प्रार्थनाही करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. रतन मेहेत्रे, ताराचंद ठोकळ आणि अशोक पराते यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. वाढते तापमान, पावसाचे बदलते प्रमाण, पाण्याची टंचाई आणि दुष्काळाचे संकट लक्षात घेता वृक्षारोपण व संवर्धनाचे आणि निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. केवळ वृक्षारोपण करून न थांबता लावलेल्या झाडांचे संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारण्याचे स्पष्ट करण्यात आले. भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करताना भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्विनी थोरात, अजय गव्हाणे, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, सरदारसिंग परदेशी, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, प्रांजली सपकाळ, जोगिंदरसिंग, ईशान शेख, जैद सय्यद, प्रशांत चोपडा अश्विनी गोरखे, लताताई गुरव, माधवी माळगे, संगीता सपकाळ, अनिता शेलार, कीर्ती ठाकूर, महिमा माळगे, अंजना भुजबळ, सुनिता गडाख, दिलीप ठोकळ, रमेश वराडे, ईवान सपकाळ, विलास आहेर, मंदिराचे पुजारी सुनील देवा गुरव, नंदू भंडारे, राहुल पानसरे, सोनू भुजबळ, संजय येलुलकर, सरोवर खान, अश्विन ठाकूर आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्विनी थोरात यांनी धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अन्नदान, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक स्वच्छता या गोष्टी समाजाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असून, त्यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने योगदान देणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त केली.

# रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे आपधूप ग्रामस्थ हैराण; प्रशासनाचे दुर्लक्ष

### खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला । कायमस्वरूपी डांबरीकरणाची मागणी, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील आपधूप गावात जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून निधीअभावी रस्त्यांची दुरवस्था झाली असून, या खराब रस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आपधूप ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



गावातील प्रमुख चौकांसह अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यावरील डांबर उखडले असून, केवळ खडी शिल्लक राहिली आहे. त्यामुळे दुचाकी घसरून अपघात होण्याच्या घटना घडत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

आपधूप गावातील कुलदैवत खंडोबा मंदिराकडे जाणारा रस्ता तसेच सुपा, वाळवणे परिसरातील भाविकांची आणि औद्योगिक क्षेत्रामुळे वाढलेली वाहतूक यामुळे या रस्त्याचे महत्त्व वाढले आहे. मात्र, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहतुकीचा वेग मंदावला असून, त्याचा थेट फटका नोकरदार वर्ग, शाळकरी विद्यार्थी, शेतमाल घेऊन जाणारे शेतकरी तसेच रुग्णवाहिकांना बसत आहे. संथ वाहतुकीमुळे ग्रामस्थांचा वेळ आणि इंधनही मोठ्या प्रमाणात वाया जात आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी संबंधित अधिकारी आणि विभागाकडे अनेकदा लेखी तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून केवळ तात्पुरती डागडुजी केली जाते. खड्ड्यांमध्ये माती आणि विटांचे तुकडे टाकून वेळ मारून नेली जाते; मात्र हे साहित्य पहिल्याच पावसात वाहून जाते.

रस्त्यांच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळेच सध्याची दुरवस्था निर्माण झाल्याचा आरोप आपधूप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने रस्त्यांच्या कामाची पाहणी करून दर्जाची तपासणी करावी आणि कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

या गंभीर समस्येची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन रस्त्यांचे डांबरीकरण करावे आणि ग्रामस्थांना सुरक्षित व सुरळीत वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. येत्या काही दिवसांत रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली नाही, तर ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आपधूप गावातील ग्रामस्थांनी दिला आहे.

## वाचन सप्ताहाचा 'अभिनव' उपक्रम

### अभिनवमध्ये प्रश्नमंजुषा, पुस्तक परीक्षण, ऑनलाइन क्विजसह ग्रंथप्रदर्शन

**● अकोले । वीरभूमी–**

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून अभिनव शिक्षण संस्थेच्या ग्रंथालय विभागातर्फे ९ ते १५ ऑक्टोबरदरम्यान वाचन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले.



संस्थेतील विविध विभागांतील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, लेखनकौशल्य विकसित करणे, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता वाढविणे तसेच सामाजिक जाणीव आणि ज्ञानाची अभिरुची निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. वाचन सप्ताहांतर्गत विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, पुस्तक परीक्षण, ऑनलाइन क्विज स्पर्धा, मोफत ऑनलाइन शैक्षणिक साधनसंपत्तीविषयी माहिती देणारी कार्यशाळा तसेच ग्रंथप्रदर्शन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुस्तकांशी जोडण्याबरोबरच डिजिटल माध्यमांद्वारे उपलब्ध असलेल्या विविध ज्ञानस्रोतांची माहिती करून देण्यात आली. वाचन सप्ताहाचा समारोप प्रख्यात शैक्षणिक व सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी आणि विवेक वाकचौरे यांच्या व्याख्यानमालेने करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, संस्थेच्या कोषाध्यक्षा तसेच वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, संस्थेचे सचिव विक्रम नवले, सहसचिव अल्फोंसा डी., अभिनव कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राचार्या डॉ. कुसुम वाकचौरे, एमबीए विभागप्रमुख प्रा. शोएब शेख, ज्युनिअर कॉलेजच्या विभागप्रमुख प्रा. स्मिता पुंड, ग्रंथालय विभागप्रमुख प्रा. मनिषा गडाख, ग्रंथालय सहाय्यक लता गभाले तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहल देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. मयुरी धुमाळ यांनी केले.

## समान काम, समान वेतनासाठी श्रीगोंदा न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून आंदोलन

### १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा । शासनाच्या निर्णयाकडे लक्ष

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

समान काम, समान वेतनाच्या मागणीसाठी श्रीगोंदा न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी गुरुवारी (दि. १६) काळ्या फिती लावून कामकाज करत शासनाचा निषेध नोंदविला. उच्च न्यायालयाने सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव ३१ जानेवारी २०२५ रोजी शासनाकडे पाठवूनही अद्याप मंजुरी मिळालेली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे. मागणी मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा कर्मचारी संघटनांनी दिला आहे.



महाराष्ट्रातील दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव गेल्या २० ते २२ महिन्यांपासून शासनाकडे प्रलंबित आहे. या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य गट क महासंघ, लघुलेखक महासंघ, बेलिफ महासंघ आणि शिपाई महासंघ यांच्या माध्यमातून आंदोलन सुरू आहे. मागणी मान्य न झाल्यास यंदाची दिवाळी साजरी न करण्याचा निर्धारही कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

जिल्हा न्यायालयाचे अधीक्षक व्ही. पी. वाघमारे म्हणाले, न्यायव्यवस्थेचा कणा असलेले कर्मचारी वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने काम करीत आहेत. शासनाने आंदोलनाची दखल न घेतल्यास ५ नोव्हेंबर रोजी राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी एक दिवस सामूहिक रजेवर जातील. त्यामुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. शासनाने या मागणीवर तातडीने तोडगा काढावा.

या आंदोलनात अधीक्षक व्ही. पी. वाघमारे, यू. एस. मोटकर, बी. जे. झिणे, श्रीमती सरोदे, हौडगे, शहाजी दातीर, आनंद कारंजकर, मुश्तकीम शेख, सचिन डमरे, महादेवी चव्हाण, श्रद्धा भंडारी, आकांक्षा वांढेकर, कुंडलिक बेलेकर, सुशांत कदम, बालाजी खुडे, शेखर मेहेत्रे, सचिन सरवदे, दीपक मदने, सागर खडके, सागर धायतडक, दिगंबर शेळके आदी न्यायालयीन कर्मचारी सहभागी झाले होते.

## पाथर्डी-शेवगावचे दोन सुपुत्र हैदराबादेत एकत्र

**● शेवगाव । वीरभूमी –**

पाथर्डीचे सुपुत्र तथा तेलंगणा राज्याचे अप्पर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) महेश भागवत (भा. पो.से.) यांची शेवगावचे सुपुत्र तथा अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांनी हैदराबाद येथे त्यांच्या कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. यावेळी दोन्ही अधिकाऱ्यांमध्ये पोलीस प्रशासन, कायदा व सुव्यवस्था, स्पर्धा परीक्षा तसेच प्रशासकीय सेवेत येऊ इच्छिणाऱ्या तरुणांसाठी मार्गदर्शन अशा विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

ईश्वर कातकडे हे हैदराबाद येथील राष्ट्रीय पोलीस अकादमीत प्रशिक्षणासाठी गेले असताना त्यांनी महेश भागवत यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. या भेटीदरम्यान कातकडे यांनी भागवत यांना "Why We Are Who We Are' हे पुस्तक भेट देऊन त्यांचा सन्मान केला. दोन्ही अधिकाऱ्यांनी विविध विषयांवर मनमोकळ्या गप्पा मारत अनुभवांची देवाणघेवाण केली.

**राष्ट्रीय पोलीस अकादमीतील प्रशिक्षणाच्या निमित्ताने भेट**

■ पाथर्डीचे सुपुत्र महेश भागवत आणि शेवगावचे सुपुत्र ईश्वर कातकडे या दोन्ही अधिकाऱ्यांची हैदराबाद येथे झालेली सदिच्छा भेट विशेष ठरली. राष्ट्रीय पोलीस अकादमीतील प्रशिक्षणाच्या निमित्ताने झालेल्या या भेटीत पोलीस प्रशासनातील अनुभवांची देवाणघेवाण आणि परस्पर संवादाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

प्रशासकीय अनुभवाचा तरुणांना लाभ

महेश भागवत हे पाथर्डीचे सुपुत्र असून, सध्या तेलंगणा राज्यात अप्पर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) या महत्त्वपूर्ण पदावर कार्यरत आहेत. राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच पोलीस प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी ते कार्यरत आहेत. त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा आणि कार्यपद्धतीचा अनेकांना लाभ होत आहे.

विशेष म्हणजे, भागवत हे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी मार्गदर्शनही करतात. प्रशासकीय सेवेत येण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांना मुलाखतीची तयारी, व्यक्तिमत्त्व विकास तसेच प्रशासकीय सेवेतील जबाबदाऱ्या याबाबत मार्गदर्शन करून ते प्रोत्साहन देतात.

### महेश भागवत व ईश्वर कातकडे यांची सदिच्छा भेट; पोलीस प्रशासन, यूपीएससी मार्गदर्शनावर चर्चा



# दुष्काळाला जबाबदार कोण? शेतकऱ्यांनी जगायचे तरी कसे?

### निसर्गाची अवकृपा, वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव; शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटावर कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज

**■ जनार्दन जगताप**

**● कोपरगाव । वीरभूमी –**

महाराष्ट्रातील शेतकरी आज मोठ्या आर्थिक संकटातून जात आहे. कधी पावसाअभावी दुष्काळ, तर कधी अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ; कधी पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव, तर कधी बाजारभावातील घसरण–संकट कोणतेही असो, त्याची सर्वाधिक झळ मात्र शेतकऱ्यालाच सोसावी लागते. शेतात राबायचे शेतकऱ्याने, उत्पादनाचा खर्च करायचा शेतकऱ्याने, निसर्गाच्या लहरीपणाचा धोका पत्करायचा शेतकऱ्याने आणि शेवटी शेतीमालाला योग्य भाव मिळवण्यासाठीही संघर्ष करायचा शेतकऱ्यानेच. मग प्रश्न पडतो–शेतकऱ्यांनी जगायचे तरी कसे आणि त्यांना न्याय कधी मिळणार?

**महागाई वाढते, पण शेतमालाचे भाव का वाढत नाहीत?**

बाजारात एखादी वस्तू तयार झाली की तिच्या किमती वाढत जातात. कारखान्यातील उत्पादन खर्च वाढला की उत्पादक किंमतवाढीचे समर्थन करतात. वाहतूक खर्च वाढला, इंधन महागले किंवा कच्च्या मालाच्या किमती वाढल्या की त्याचा परिणाम ग्राहकांच्या खिशावर होतो. अनेक वस्तूंच्या किमती वाढल्यानंतर त्या सहजासहजी कमी होताना दिसत नाहीत.

मात्र, शेतीसाठी लागणारी खते, बियाणे, कीटकनाशके, औषधे, डिझेल, वीज, मजुरी आणि यंत्रसामग्री यांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असताना शेतकऱ्याच्या उत्पादनाला अपेक्षित भाव मिळेलच, याची कोणतीही खात्री नसते. बाजारात मालाची आवक वाढली की भाव कोसळतात.

उत्पादन खर्चही भरून निघत नसेल, तर शेतकऱ्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा? मुलांचे शिक्षण, घरखर्च, आरोग्याचा खर्च आणि कर्जाचे हप्ते कसे फेडायचे? उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळण्याची हमी का नसावी? हा प्रश्न केवळ शेतकऱ्याचा नसून संपूर्ण कृषी व्यवस्थेचा आहे.

**दुष्काळात शेतकरी एकटा का पडतो?**

दुष्काळ पडला की शेतातील पिके करपतात. विहिरींची पाणीपातळी घटते. जनावरांसाठी चारा आणि पाण्याची टंचाई निर्माण होते. पिकांसाठी केलेला खर्च वाया जातो. पावसाच्या भरवशावर जगणाऱ्या शेतकऱ्याचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडते.

मात्र, अनेकदा मदतीच्या घोषणांनंतरही प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागते, अशा तक्रारी समोर येतात. मदत मिळेपर्यंत पुढील हंगामाची वेळ आलेली असते.



पुन्हा कर्ज काढायचे, पुन्हा पेरणी करायची आणि पुन्हा निसर्गाच्या भरवशावर जगायचे–हे चक्र किती दिवस सुरू राहणार?

**शेतमालाचा भाव ठरवण्याची ताकद शेतकऱ्याकडे कधी येणार?**

शेतकरी कांदा, टोमॅटो, कापूस, सोयाबीन, ऊस अशी विविध पिके घेतो; पण त्याच्या मालाचा बाजारभाव ठरवताना त्याची भूमिका किती असते, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

उत्पादन खर्च वाढला म्हणून बाजारभाव वाढेलच, असे नाही. मालाला योग्य भाव मिळाला नाही तर तो साठवून ठेवण्याची क्षमता प्रत्येक शेतकऱ्याकडे नसते. नाशवंत माल असेल तर तो विकण्याशिवाय अनेकदा पर्याय उरत नाही. अशा परिस्थितीत शेतकरी कमी भावाने माल विकण्यास बाध्य होतो आणि कधी उत्पादन खर्चही वसूल होत नाही.

दुसरीकडे ग्राहकाला बाजारात महागाईचा सामना करावा लागतो, तर शेतकऱ्याला कमी भावामुळे नुकसान सहन करावे लागते. या व्यवस्थेत उत्पादक आणि ग्राहक या दोघांच्याही हिताचे रक्षण होईल, अशी पारदर्शक व परिणामकारक यंत्रणा उभी करण्याची गरज आहे. ज्या पिकांना हमीभाव लागू आहे, त्या पिकांच्या उत्पादकांना प्रत्यक्ष खरेदीचा लाभ किती मिळतो, हाही महत्त्वाचा प्रश्न आहे.

**शेतकरी देशाचा पोशिंदा; पण त्याच्या कुटुंबाची जबाबदारी कोणाची?**

शेतकरी अन्नधान्य पिकवतो म्हणून देशातील नागरिकांच्या ताटात अन्न येते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मोठा आधार शेती आहे. शेतीशी संबंधित बाजारपेठा, वाहतूक, प्रक्रिया उद्योग आणि अनेक व्यवसाय शेतकऱ्यांच्या उत्पादनावर अवलंबून आहेत.

तरीही शेती करणाऱ्या कुटुंबाला आर्थिक सुरक्षिततेची हमी मिळत नसेल, तर ही गंभीर चिंतेची बाब आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा होते, आश्वासने दिली जातात आणि मदतीच्या घोषणा होतात; परंतु शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य निर्माण करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे.

शासन कोणतेही असो, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शेतीच्या उत्पादन खर्चाचा वास्तववादी विचार, बाजारभावातील चढ–उतारांपासून संरक्षण, सिंचन सुविधा आणि वेळेवर आर्थिक मदत यांना प्राधान्य दिले पाहिजे.

शेतकऱ्याला मदत देणे म्हणजे त्याच्यावर उपकार करणे नव्हे. देशाच्या अन्नसुरक्षेत योगदान देणाऱ्या उत्पादकाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे ही सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाची जबाबदारी आहे.

आज शेतकरी विचारतो आहे–महागाई वाढली की प्रत्येक क्षेत्राला किंमतवाढीचा आधार मिळतो; मग शेतकऱ्याच्या उत्पादनाला योग्य भाव का मिळत नाही?

शेतकरी वाचला, तर शेती वाचेल; शेती वाचली, तर ग्रामीण अर्थव्यवस्था वाचेल. आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम झाली, तरच देशाच्या विकासाला भक्कम आधार मिळेल. देशाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यालाच जगण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर या व्यवस्थेने आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

**पर्यावरणाची हानी आणि अनियंत्रित मानवी हस्तक्षेप**

मनुष्याने निसर्गाशी समतोल राखून जीवन जगणे आवश्यक आहे. निसर्गाचा अवमान, पर्यावरणाची हानी आणि अनियंत्रित मानवी हस्तक्षेप यांचे दुष्परिणाम समाजाला भोगावे लागत आहेत. म्हणूनच 'जशी क्रिया, तशी प्रतिक्रिया' येते, हा कर्मसिद्धांत आहे. भूकंप, अतिवृष्टी आणि दुष्काळ हा निसर्गाचा कोप आहे, असे मत महंत रामगिरी महाराज, मठाधिपती, गोदाधाम यांनी व्यक्त केले आहे.

# मोहटादेवीच्या वाटेवर सेवाभावी हातांचा जागर!

## पायी जाणाऱ्या भाविकांसाठी चहा-पाणी, मसाला दूध, साबुदाणा खिचडी अन् फराळाची मोफत व्यवस्था

**● पाथर्डी । वीरभूमी-**

**श्रद्धा, भक्ती आणि सेवाभावाचा अनोखा संगम नवरात्रोत्सवात अनुभवायला मिळत असून, सातव्या माळेनिमित्त श्रीक्षेत्र मोहटादेवी गडाकडे पायी निघालेल्या भाविकांच्या सेवेसाठी पाथर्डी शहरासह मोहटादेवी मार्गावर ठिकठिकाणी सेवाभावी हात सरसावले आहेत. 'देवीच्या दर्शनाला जाणाऱ्या प्रत्येक भाविकाची सेवा हीच देवीची सेवा' या भावनेतून विविध मित्रमंडळे, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक आणि संघटनांनी भाविकांसाठी मोफत चहा-पाणी, साबुदाणा खिचडी, फराळ, फळे, मसाला दूध, बिस्किटे तसेच औषधांची व्यवस्था केली आहे. भक्तीच्या वाटेवर माणुसकीचा सुगंध दरवळत असून, या सेवाकार्यामुळे पायी जाणाऱ्या भाविकांचा प्रवास अधिक सुखकर होत आहे.**

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मोहटादेवी गडाकडे पायी जाणाऱ्या भाविकांची संख्या वाढू लागली आहे. सातव्या माळेच्या निमित्ताने देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने पायी प्रवास सुरू केला आहे. शनिवारी सायंकाळनंतर महिला आणि लहान मुलांसह येणाऱ्या भाविकांची गर्दी वाढल्याने नगररोड आणि शेवगाव रोड परिसर भाविकांच्या वर्दळीने फुलून गेला होता. 'आई मोहटादेवीचा जयघोष' करत, हलगी-डफ वाजवत आणि मुखी देवीचे नामस्मरण करीत भाविक गडाच्या दिशेने मार्गक्रमण करताना दिसत होते.

या भक्तिमय वातावरणात भाविकांना थकवा जाणवू नये, त्यांना वेळेवर पाणी व अल्पोपहार मिळावा आणि गरजेनुसार औषधे उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने शहरात विविध ठिकाणी सेवा स्टॉल उभारण्यात आले आहेत. पायी प्रवास करणाऱ्या भाविकांना विश्रांतीसाठी थांबता यावे, पिण्याचे पाणी मिळावे आणि पुढील प्रवासासाठी ऊर्जा मिळावी, यासाठी कार्यकर्ते मनापासून सेवा देत आहेत. विशेषतः महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ भाविकांना या सेवाव्यवस्थेचा मोठा दिलासा मिळत आहे.

कोरडगाव चौकात सुकामेव्याच्या मसाला दुधाची पर्वणी

पाथर्डी शहरातील कोरडगाव चौकात इंजि. रामेश्वर शिवणकर, उद्योजक रोहित रणखांब, राजशेठ शहाणे, सचिन खोर्दे, बबलू खोर्दे, आदित्य डोमकावळे, अक्षय भापकर, मयूर रोडी, प्रसाद रोडी, महेश अंतरकर, राहुल रणखांब, सिद्धार्थ रोडी, भगवान बटुळे, योगेश शिंदे, मन्नु डोमकावळे, अनिल खाटेर, ऋषीकेश पालवे, दहीफळे आदींच्या मित्रमंडळाच्या वतीने भाविकांसाठी केशर, काजू, बदाम आदी सुकामेव्याने युक्त मसाला दुधाचे मोफत वाटप करण्यात आले.

लांबचा पायी प्रवास करून येणाऱ्या भाविकांनी या मसाला दुधाचा लाभ घेतला. सेवा देणाऱ्या कार्यकर्त्यांच्या उपक्रमाचे भाविकांनी कौतुक केले.

याचबरोबर भाविकांच्या सेवेसाठी वामनभाऊनगर मित्रमंडळ, उद्योजक गणेश सोनटक्के मित्रमंडळ, चैतन्य अर्बन ग्रुप, सामाजिक कार्यकर्ते आजिनाथ डोमकावळे मित्रमंडळ, पावन गणपती प्रतिष्ठान, नवोदय तरुण मंडळ, चिंचपूर रोड मित्रमंडळ, मोरया प्रतिष्ठान, नगरसेवक देवा पवार मित्रमंडळ, सावता ग्रुप तसेच शेवगाव तालुका मेडिकल असोसिएशन आदींच्या वतीने विविध ठिकाणी सेवा स्टॉल उभारण्यात आले होते.

या स्टॉलच्या माध्यमातून भाविकांना आवश्यकतेनुसार चहा-पाणी, फराळ, खिचडी, फळे, बिस्किटे, मसाला दूध आणि



औषधांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे हा उपक्रम केवळ धार्मिक उत्सवापुरता मर्यादित न राहता यात्रेच्या काळात सामाजिक बांधिलकी जपणारा ठरला आहे.

विविध वयोगटांतील कार्यकर्ते एकत्र येऊन भाविकांना सेवा देत असल्याने पाथर्डी शहरात उत्साह आणि भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सेवाभावी मंडळांनी धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक एकोपा आणि माणुसकीचेही दर्शन घडविले आहे.

स्वतःचा वेळ देऊन, आवश्यक साहित्याची व्यवस्था करून आणि भाविकांना आपुलकीने खाऊ-पिऊ घालत कार्यकर्ते सेवाकार्यात सहभागी झालेले दिसत आहेत. भाविकांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि सेवाकार्यात रमलेल्या कार्यकर्त्यांचा उत्साह हेच या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

# पतसंस्थांनी सभासदांना १० किलो साखर द्यावी; सचिन शेटे यांचे आवाहन

## दुष्काळामुळे शेतकरी अडचणीत । शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी सहकाराने पुढे यावे

**● अकोले । वीरभूमी-**



राज्यासह अकोले तालुक्यात दुष्काळाची तीव्र परिस्थिती निर्माण झाली असून, यंदाची दिवाळी साजरी करणे शेतकरी व कष्टकरी वर्गासाठी कठीण झाले आहे. त्यामुळे दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन तालुक्यातील सर्व पतसंस्थांनी आपल्या सभासदांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी १० किलो साखर मोफत द्यावी आणि अडचणीत सापडलेल्या सभासदांसह त्यांच्या लेकरांची दिवाळी गोड करावी, असे आवाहन शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख सचिन संदीप शेटे यांनी केले आहे.

शेटे यांनी अकोले तालुका पतसंस्था फेडरेशन तसेच तालुक्यातील सर्व पतसंस्थांचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांना निवेदन देऊन ही मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण महाराष्ट्र सध्या दुष्काळाने होरपळत असून, अकोले तालुकाही त्याला अपवाद नाही. शासनाने अकोले तालुका दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केला आहे, ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने समाधानाची बाब आहे. मात्र, आगामी काही दिवसांत दसरा-दिवाळीसारखे महत्त्वाचे सण येत असून, दुष्काळाचा मोठा परिणाम या सणांच्या काळात बाजारपेठेवरही होणार आहे.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. एका बाजूला खते, बियाणे, औषधे तसेच पशुखाद्याचे वाढलेले दर आहेत, तर दुसऱ्या बाजूला शेतमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. यावर्षी पाऊस कमी झाल्याने एकरी १२ ते १४ क्विंटल उत्पादन देणारी सोयाबीनची पिके केवळ ४ ते ५ क्विंटलपर्यंत आली आहेत. त्यामुळे सोयाबीन काढणीसाठी लागणारी मजुरी देणेही शेतकऱ्यांना अवघड झाले आहे.

अशा परिस्थितीत दिवाळीत नवीन कपडे घेणे, फराळ व गोडधोड करणे यासारख्या साध्या गरजाही पूर्ण करणे अनेक कुटुंबांसमोर मोठे आव्हान बनले आहे.

अकोले तालुक्यात सहकाराची चळवळ जिवंत ठेवण्यात सहकारी पतसंस्थांच्या जाळ्याचे मोठे योगदान आहे. तालुक्यातील पतसंस्थांनी आजपर्यंत चांगला कारभार करत शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून आधार देण्याचे काम केले आहे.

याच पार्श्वभूमीवर सध्याच्या दुष्काळी संकटातही पतसंस्थांनी शेतकरी सभासदांच्या पाठीशी उभे राहावे. प्रत्येक पतसंस्थेने आपल्या सभासदांना प्रत्येकी १० किलो साखर मोफत देऊन त्यांना दिलासा द्यावा आणि त्यांच्या लेकरांची दिवाळी गोड करावी, असे आवाहन सचिन संदीप शेटे यांनी केले आहे.

# सण उत्सवातील भयावह देखाव्यांबाबत आयोजकांनी खबरदारी घ्यावी!

## डॉ. गावित्रे । लहान मुले व संवेदनशील व्यक्तींच्या मानसिक आरोग्याची काळजी घ्यावी

**● कोपरगाव । वीरभूमी-**

नवरात्रोत्सव आणि गणेशोत्सवाच्या काळात विविध सार्वजनिक मंडळांकडून भुतांचे, रक्तपाताचे तसेच भयावह दृश्ये आणि मोठ्या आवाजांचा वापर असलेले देखावे सादर केले जातात. मनोरंजनाच्या उद्देशाने उभारण्यात येणारे हे देखावे काही लहान मुले, संवेदनशील व्यक्ती आणि हृदयविकार असलेल्या नागरिकांसाठी त्रासदायक ठरू शकतात. त्यामुळे देखाव्यांचे आयोजन करताना नागरिकांच्या मानसिक आरोग्याचा, शारीरिक सुरक्षिततेचा आणि सार्वजनिक हिताचा विचार करावा, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

अचानक समोर येणारी भयावह दृश्ये, मोठ्या आवाजातील ध्वनी, अंधार आणि डोळ्यांना त्रासदायक ठरणारे चमकणारे दिवे यांमुळे काही व्यक्तींना तीव्र भीती, घबराट, धडधड किंवा मानसिक अस्वस्थता जाणवू शकते. विशेषतः लहान मुलांच्या मनावर अशा अनुभवांचा परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन पालकांनी आणि आयोजकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी.

भयावह देखावा काल्पनिक असल्याची स्पष्ट सूचना प्रवेशद्वारावर लावावी. लहान मुले, गर्भवती महिला, हृदयविकार असलेल्या व्यक्ती तसेच अशा दृश्यांमुळे अस्वस्थता जाणवण्याची शक्यता असलेल्या नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करणारा फलक असावा. देखाव्यातून बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र आणि सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा. गर्दीचे योग्य व्यवस्थापन करावे आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत करण्यासाठी स्वयंसेवकांची व्यवस्था ठेवावी. तसेच ध्वनिप्रदूषणासंबंधी नियमांचे पालन करून ध्वनीची तीव्रता मर्यादित ठेवावी. अचानक मोठे आवाज, अतितीव्र प्रकाश आणि नागरिकांना अनावश्यक मानसिक धक्का बसू शकेल अशा बाबी टाळाव्यात. देखावा पाहताना कोणाला अस्वस्थ वाटल्यास त्यांना तातडीने सुरक्षित ठिकाणी जाण्यास मदत करावी.

सण हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजप्रबोधनाची मोठी संधी आहे. त्यामुळे सार्वजनिक मंडळांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकिल्ले, महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास, वैज्ञानिक दृष्टिकोन, अंधश्रद्धा निर्मूलन, अवयवदान, नेत्रदान, देहदान, बालविवाह प्रतिबंध, स्त्रीशिक्षण आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवर देखावे सादर करावेत. अशा उपक्रमांमुळे नागरिकांचे मनोरंजन होण्याबरोबरच समाजाला उपयुक्त संदेशही मिळू शकतो.

महाराष्ट्रात जादूटोणा आणि अमानवी, अनिष्ट प्रथांच्या विरोधात कायदा अस्तित्वात आहे. मात्र, केवळ भुतांचा देखावा सादर केला म्हणून आपोआप गुन्हा ठरत नाही. संबंधित देखाव्यात कायद्याने प्रतिबंधित कृती, जादूटोण्याच्या नावाखाली फसवणूक किंवा इतर बेकायदेशीर प्रकार आढळल्यास वस्तुस्थिती आणि लागू कायद्यांनुसार कारवाई होऊ शकते. अशा प्रकरणांत नागरिकांनी संबंधित पोलीस प्रशासनाच्या निदर्शनास बाब आणून द्यावी.

सण-उत्सवांमध्ये कोणाच्याही भावना दुखावण्याचा किंवा कोणत्याही मंडळाला विरोध करण्याचा हेतू नसून, उत्सव सुरक्षित, आनंददायी आणि समाजप्रबोधन करणारे व्हावेत, हा या आवाहनामागील उद्देश आहे. आयोजकांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे आणि अंधश्रद्धेपेक्षा वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने डॉ. अशोक गावित्रे यांनी केले आहे.

# 'महिंद्रा'ने बाजारात आणली 'एक्सयूव्ही ३ एक्सओ झेडएनजी'

## सीएनजीमध्येही टर्बो इंजिनची दमदार कामगिरी । २४.७ किमी प्रतिकिलो मायलेज, किंमत ९.९९ लाख रुपयांपासून

**● मुंबई । वीरभूमी-**

भारतातील आघाडीची एसयूव्ही उत्पादक कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड हिने 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी' ही आपली पहिली सर्वसामान्य ग्राहकांसाठीची सीएनजी प्रवासी कार बाजारात आणली आहे. या गाडीची सुरुवातीची किंमत ९.९९ लाख रुपये (एक्स-शोरूम) आहे.

'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'मुळे सीएनजी गाड्यांमधूनही वेगवान आणि उत्साही ड्रायव्हिंगचा अनुभव घेता येतो, हे दिसून येईल. या गाडीत टर्बोचार्ज्ड इंजिन आहे. सीएनजी आणि पेट्रोल या दोन्ही प्रकारच्या इंधनांवर हे इंजिन ८२ किलोवॅट शक्ती आणि २०० एनएम टॉर्क देते. ही गाडी प्रति किलो सीएनजीमध्ये २४.७ किलोमीटरचे प्रमाणित मायलेज देते. त्यामुळे ड्रायव्हिंगचा आनंद कायम ठेवून इंधनावरील खर्च कमी करण्याचा पर्याय ग्राहकांना मिळतो. 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'मध्ये केवळ सीएनजीची बचतच नाही, तर टर्बोचार्ज्ड इंजिनची कामगिरी, आकर्षक डिझाइन, प्रशस्त जागा, आधुनिक तंत्रज्ञान, आरामदायी प्रवास आणि सुरक्षितता यांचाही समावेश आहे. आकर्षक किमतीत उपलब्ध असलेली ही गाडी सीएनजी एसयूव्ही घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी एक चांगला पर्याय आहे.

'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'मुळे एसयूव्ही खरेदी करणे अधिक ग्राहकांना शक्य होणार आहे. विशेषतः पहिल्यांदाच एसयूव्ही घेऊ इच्छिणाऱ्या आणि अधिक शक्तिशाली इंजिन व आधुनिक सुविधांची अपेक्षा असलेल्या ग्राहकांसाठी ही गाडी चांगला पर्याय आहे. या गाडीच्या सुरुवातीच्या प्रकारातही २६.०३ सेंटीमीटरची एचडी टचस्क्रीन, क्रूझ कंट्रोल, मागील सीटसाठी एसी व्हेंट्स आणि ६०:४० प्रमाणात विभागता येणारी मागील सीट अशा प्रीमियम सुविधा आहेत. साहजिकच, सीएनजीमुळे इंधनावरील खर्च कमी होतोच, शिवाय 'एक्सयूव्ही ३एक्सओ'ची खास रचना, आधुनिक तंत्रज्ञान आणि दैनंदिन वापरातील सोयीही अनुभवता येतात. ड्रायव्हिंगच्या आनंदात कोणतीही तडजोड करावी लागत नाही.

'महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड'च्या ऑटोमोटिव्ह व्यवसायाचे अध्यक्ष डॉ. वेलुसामी आर. म्हणाले, 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'चे वैशिष्ट्य म्हणजे कोणतीही तडजोड न करता उत्तम अनुभव देणे. आजच्या ग्राहकांना 'एसयूव्ही'मधील प्रशस्त जागा, आधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षितता आणि उत्तम ड्रायव्हिंगचा अनुभव हवा असतो. त्याच वेळी सीएनजीमुळे इंधनावरील खर्चही कमी व्हावा, अशी त्यांची अपेक्षा असते. या गाडीत तिच्या श्रेणीतील सर्वोत्तम टॉर्क, टर्बोचार्ज्ड इंजिनची कामगिरी आणि प्रभावी मायलेज यांचा संगम आहे. त्यामुळे 'सीएनजी'ची किफायतशीरता आणि एसयूव्ही चालवण्याचा आनंद या दोन्ही गोष्टी एकाच गाडीत मिळतात. 'सीएनजी एसयूव्ही'कडून ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी ही गाडी नवा मापदंड ठरवेल.

**मुख्य वैशिष्ट्ये :**

**टर्बो इंजिनची दमदार कामगिरी व ड्रायव्हिंगचा उत्साह - सीएनजी व पेट्रोल, दोन्ही प्रकारांत**

कामगिरीत कोणतीही तडजोड नाही : १.२ लिटरचे एमस्टॅलियन टीसीएमपीएफआय टर्बोचार्ज्ड इंजिन हे सीएनजी आणि पेट्रोल या दोन्ही प्रकारांत ८२ किलोवॅट शक्ती आणि २०० एनएम टॉर्क देते. टर्बोचार्जरची कार्यपद्धती आणि इंजिनचे इलेक्ट्रॉनिक नियंत्रण यंत्रणा (ईसीयू) यांची योग्य जुळवणी केल्यामुळे इंधनाचा प्रकार कोणताही असला, तरी इंजिनची शक्ती आणि टॉर्क समान राहतात. त्यामुळे प्रत्येक प्रवासात एक्सयूव्ही ३एक्सओची दमदार कामगिरी आणि ड्रायव्हिंगचा आनंद अनुभवता येतो.

**प्रकारनिहाय किंमत**

| गाडीचा प्रकार | एक्स-शोरूम किंमत |
|---|---|
| एमएक्स - | ९.९९ लाख |
| एज- | १०.७९ लाख |
| रेव्हएक्स एज (ओ)- | ११.१९ लाख |
| एएक्स५- | १२.२७ लाख |

(सर्व किंमती एक्स-शोरूम आहेत.)

**या श्रेणीतील सर्वाधिक टॉर्क :** भारतातील सीएनजी प्रवासी गाड्यांमध्ये 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'चा २०० एनएम टॉर्क सर्वोत्तम आहे. १,५०० ते ३,५०० आरपीएम या इंजिनच्या वेगमर्यादेतही हा टॉर्क उपलब्ध होतो. त्यामुळे गाडी वेगाने पुढे जाते. शहरातील रस्त्यांवर तसेच महामार्गावरही गाडी चालवणे सहज आणि आत्मविश्वासपूर्ण होते.

**वेगाने पकडते गती :** सीएनजीवर चालताना 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'ला ताशी ० ते ६० किलोमीटर वेग गाठण्यासाठी ४.९ सेकंद, तर ताशी ० ते १०० किलोमीटर वेग गाठण्यासाठी ११.८ सेकंद लागतात. अधिक अंतर कापा, ड्रायव्हिंगचा आनंद घ्या.

**मायलेज आणि कामगिरी यांचा उत्तम मेळ :** या गाडीचे प्रमाणित मायलेज प्रति किलो सीएनजीमागे २४.७ किलोमीटर इतके आहे. त्यामुळे इंधनावरील खर्च कमी होतो. त्याच वेळी, एक्सयूव्ही ३एक्सओकडून अपेक्षित असलेली टर्बो इंजिनची दमदार कामगिरीही अनुभवता येते.

**सीएनजी आणि पेट्रोलचा सहज वापर :** चालकाला सीएनजी किंवा पेट्रोल यांपैकी कोणत्याही इंधनावर गाडी चालवता येते. सीएनजी कमी झाल्यास गाडी आपोआप पेट्रोलवर चालू लागते. त्यामुळे प्रवासात खंड पडत नाही आणि ड्रायव्हिंगचा आनंद कायम राहतो.

**वापरातील सोयी लक्षात घेऊन केलेली रचना :** गाडीच्या डिस्प्लेवर सरासरी आणि





त्या क्षणाचे मायलेज दिसते. त्यामुळे इंधनाचा वापर किती होत आहे, याची माहिती तत्काळ मिळते. एनजीव्ही फास्ट-फिलिंग व्हॉल्व्हमुळे सीएनजी भरण्यास कमी वेळ लागतो आणि ही प्रक्रिया अधिक सोयीस्कर होते. त्यामुळे ड्रायव्हिंगचा आनंद घेण्यासाठी अधिक वेळ मिळतो.

स्मार्ट रचना. प्रीमियम लूक. प्रत्येक गोष्टीत झिंग!

**जागेचा कल्पक वापर :** सीएनजीच्या दोन सिलिंडरची रचना सामान ठेवण्याच्या जागेखाली केली आहे. त्यामुळे सामान ठेवण्यासाठी सपाट तळ कायम राहतो आणि डिक्कीमध्ये २७० लिटर वापरता येण्याजोगी जागा मिळते. अतिरिक्त चाक गाडीच्या तळाशी बसवलेले आहे.

**प्रीमियम एसयूव्हीचा आकर्षक लूक :** 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'मध्ये अनेक खास सुविधा आहेत. यात २६.०३ सेंटीमीटरच्या दोन स्क्रीन, स्कायरूफ', 'डॉल्बी टमॉस'चे प्रभावी ध्वनितंत्रज्ञान, काळ्या रंगाच्या लेदरसदृश सीट्स, गाडीच्या रंगातील किंवा गनमेटल ग्रे रंगातील आकर्षक ग्रिल, दोन रंगांचे स्टायलिश छत आणि काळ्या रंगाची आर१६ अलॉय व्हील्स यांचा समावेश आहे.

झिंगचा आनंद कायम ठेवत, सुरक्षेशी कोणतीही तडजोड नाही

**सर्व प्रकारांत सहा एअरबॅग्ज :** 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'च्या प्रत्येक प्रकारात सहा एअरबॅग्ज, इलेक्ट्रॉनिक स्टॅबिलिटी कंट्रोल आणि लहान मुलांच्या सीटसाठी आयएसओफिक्स माउंट्स देण्यात आले आहेत.

**सुरक्षेसाठी तत्पर यंत्रणा :** गॅस गळती ओळखणारी यंत्रणा गळती झाल्यास ती लगेच ओळखते. त्यानंतर गाडी आपोआप पेट्रोलवर चालण्याच्या मोडमध्ये जाते.

**५-स्टार सुरक्षा मानांकनासाठी तयार :** एक्सयूव्ही ३एक्सओच्या आधीच्या मॉडेलला 'भारत एनसीएपी'च्या 'प्रौढ प्रवासी सुरक्षा' आणि 'बाल प्रवासी सुरक्षा' या दोन्ही चाचण्यांमध्ये ५-स्टार मानांकन मिळाले आहे. त्याच मॉडेलच्या आधारावर एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी तयार करण्यात आली आहे.

**'एक्सयूव्ही ३एक्सओ'विषयी :** 'महिंद्रा'च्या सर्वाधिक यशस्वी एसयूव्हींपैकी 'एक्सयूव्ही ३एक्सओ' ही एक आहे. अवघ्या अडीच वर्षांपेक्षा कमी काळात या गाडीची एकूण विक्री २.५ लाखांहून अधिक झाली आहे. कॉम्पॅक्ट एसयूव्हीच्या श्रेणीत या गाडीने नवा मापदंड निर्माण केला आहे. आकर्षक डिझाइन, दमदार कामगिरी, प्रगत सुरक्षा व्यवस्था, प्रीमियम इंटिरिअर आणि या श्रेणीतील सर्वोत्तम तंत्रज्ञान यांचा मेळ या गाडीत आहे. 'महिंद्राच्या एसयूव्ही'च्या परंपरेतून तयार झालेली एक्सयूव्ही ३एक्सओ ग्राहकांना गाडी चालवण्याचा आनंददायी अनुभव देते. या श्रेणीतील अनेक वैशिष्ट्ये आणि किमतीच्या तुलनेत अधिक फायदे यामुळे आधुनिक एसयूव्ही खरेदीदारांची ती पसंती ठरली आहे.

**टेस्ट ड्राइव्ह, बुकिंग आणि गाडीची डिलिव्हरी**

'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'ची टेस्ट ड्राइव्ह १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होईल. या गाडीचे बुकिंग २० ऑक्टोबर २०२६ पासून अधिकृत डीलरकडे आणि auto.mahindra.com या संकेतस्थळावर करता येईल. गाड्यांची डिलिव्हरीही २० ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होईल.